# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाची नान्नज येथे जनजागृती रॅली

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ' जागतिक एड्सविरोधी दिवसानिमित्त' जनजागृती रॅली नान्नज येथे आयोजित करण्यात आले होती. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील इतर विद्यार्थी असे एकूण 55 विद्यार्थी व महाविद्यालयातील काही प्राध्यापक सहभागी झाले होते सदर रॅलीमध्ये 1/12/2022 रोजी जागतिक एड्सविरोधी दिनाचे महत्त्व सांगणारे विविध पोस्टर्स विद्यार्थ्यांनी तयार केले होते तसेच ' संयम पाळा - एड्स टाळा', 'आपली सुरक्षा आपल्या हातात 'अशा विविध घोषणा देत विद्यार्थ्यांनी नान्नज येथील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीमध्ये महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.स्नेहा हगरगुंडगी,प्रा. गौतम जाधव प्रा.समाधान कदम, प्रा विनय समलेटी, प्रा कविता संभारम, प्रा शितल भोजणे,प्रा.जगताप मॅडम,प्रा.सुजाता देवकर आदी प्राध्यापक उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतीशकुमार देवकर, डॉ किरण जगताप, प्रा अंकुश गोरट्याल, क्रिडा शिक्षक प्रा गोकुळ यादव आदींचे मार्गदर्शन लाभले.







Lokmangal Science & Entrepreneurship College Wadala.

Principal
Lokmangal Science &
Entrepreneurship College,Wadala